**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.०४/०९/२०२६

क्रीडा विभाग

*दहीहंडी उत्सवानिमित्त यावर्षी ८००० गोविंदांना महानगरपालिकेकडून प्रत्येकी १० लाखांपर्यंतचे विमा संरक्षण*

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही "गोपाळकाला (दहीहंडी)" उत्सव शनिवार, दि. ५ सप्टेंबर, २०२६ रोजी मोठ्या उत्साहाने साजरा केला जाणार आहे. या उत्सवात गोविंदा पथक मोठ्या उत्साहाने सहभाग घेत असतात. दहिहंडी उत्सवात भाग घेणारे गोविंदा पथक दहीहंडी फोडण्याचे आपले ध्येय साध्य करण्यासाठी मानवी मनोरे उभारतात. या साहसी उपक्रमामध्ये अपघाताची शक्यता लक्षात घेता गोविंदांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विशेष उपाययोजना करणेसाठी तसेच उत्सवामधील जोखीम व धोका विचारत घेवून गोविंदा पथकात भाग घेणा-या गोविंदांना (खेळाडू) प्रत्येकी १० लाखापर्यंतच्या विम्याचे संरक्षण देणेसाठी वसई विरार शहर महानगरपालिकेने गोपाळकाला अपघात विमा योजनेस मंजुरी दिली आहे.

या योजनेअंतर्गत दहीहंडी पथकातील सर्व गोविंदांचा मोफत अपघात विमा काढण्यासाठी सर्व गोविंदा पथकांनी दि.०३ सप्टेंबर २०२६ पर्यंत महानगरपालिकेशी संपर्क साधून पथकात समाविष्ट गोविदांचा विमा काढून या विमा योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला मोठा प्रतिसाद देत यावर्षी महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११८ पथकातील ८००० गोविंदांनी नोंदणी केली असून महानगरपालिकेमार्फत त्यांना विमा योजनेचे संरक्षण देण्यात आले आहे. विशेष म्हणजे, मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी अधिक गोविंदा पथके आणि गोविंदांनी या विमा योजनेचा लाभ घेतला आहे.

दहीहंडी उत्सव उत्साहात, सुरक्षिततेने आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यासाठी सर्व गोविंदा पथके, आयोजक आणि नागरिकांनी आवश्यक सुरक्षा उपाय योजनेचे पालन करावे, असे आवाहन वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

क्रीडा विभाग,
वसई विरार शहर महानगरपालिका